## <u>निशाण क्रमांक ३३ वरील आदेश.</u>

प्रस्तुतचे अर्जाद्वारे प्रतिदाव्यात वादी म्हणजेच मुळ दाव्यातील प्रतिवादी क्र.१ हिने प्रतिदाव्यात दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १ व २ सह कलम ९४ व १५१ अन्वये तुर्तातुर्त मनाईकरिता अर्ज दाखल केला आहे. ( प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादी क्र.१ हीने प्रतिदावा दाखल केल्याने ती प्रतिदाव्यासाठी वादी आहे. परंतु, प्रस्तुत अर्जामध्ये तिचा उल्लेख वादी न करता मुळ दाव्यामधील पक्षकार म्हणजेच **<u>प्रतिवादी क्र.१</u>** असाच करण्यात आलेला आहे व प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.१ म्हणजेच मुळ दाव्यातील वादी याचा देखील उल्लेख प्रस्तुत अर्जाच्याकामी प्रतिवादी क्र.१ न करता **<u>वादी</u>** असा करण्यात आलेला आहे. )

### <u>प्रतिवादी क्र.१ च्या प्रतिदावा मिळकतीचे वर्णन</u> :

०२. मौजे अनसिंग, ता. मालेगांव, जि. वाशिम येथील शेतजमिन गट क्र.२४, क्षेत्रफळ १ हेक्टर ८२, आकार ४.९० व हिस्सा १ हेक्टर ८२ आर यापैकी ० हेक्टर ९० आर ज्यासी चर्तुःसिमा पुर्वेस– भिमराव मुंढे गुरुजी यांची जमिन, पश्चिमेस– सुरेश निवृत्ती इंगळे व रंजना गायकवाड यांचे वाटणीवरील जमिन, उत्तरेस– साहेबराव कागणे यांचे शेत व दक्षिणेस– राजेंद्र ओंकार यांचे शेत. या चार चर्तुःसिमेच्या आतील उत्तर–दक्षिण धुरा टाकुन वाटुन दिलेली ० हेक्टर ९१ आर जमिन. (येथुन पुढे सदर जमिनीस '**प्रतिदावा मिळकत**' असे संबोधण्यात आलेले आहे.)

०३. प्रतिवादी क्र.१ यांची थोडक्यात केस अशी की, सदर प्रतिदावा मिळकत ही प्रतिवादी क्र.१ ची आई लक्ष्मीबाई निवृत्ती इंगळे यांनी दिनांक २२.०५.२०१३ रोजी प्रतिवादी क्र.१ हिला व तिचा भाऊ रमेश इंगळे यांना वाटुन दिलेली असुन तेव्हापासुन सदर प्रतिदावा मिळकत ही प्रतिवादी क्र.१ हिच्या ताब्यात व वहितीत आहे. तसेच तिचा भाऊ रमेश इंगळे हा २० वर्षापासुन बेपत्ता झालेला आहे. तसेच प्रतिदावा मिळकत गट क्र. २४ एकुण क्षेत्र १ हेक्टर ८२ आर यापैकी ० हेक्टर ९० आर जमिन वादी व प्रतिवादी क्र.२ यांना देखील वाटुन दिलेली आहे. परंतु दिनांक २८.११.२०२१ रोजी प्रतिवादी क्र.१ ही प्रतिदावा मिळकतीत तुर व हळदीच्या

पिकांची पाहणी करण्याकरीता गेली असता, तेथे वादी व प्रतिवादी क्र.२ यांनी तिला शेतात पुन्हा आली तर जिवाने मारुन टाकीन अशी धमकी दिली. त्यासंबंधीचा रिपोर्ट देखील प्रतिवादी क्र.१ यांनी पोलीस स्टेशन, मालेगांव येथे दिला आहे. एकंदरीत वादी हा प्रतिवादी क्र.१ हिला त्यांच्याकडे माणसांचा जोडजमाव असल्याने धमक्या देत आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.१ हिच्या प्रतिदावा मिळकतीमध्ये येऊन तिच्या ताब्याला व वहितीला अडथळा करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकुमाचा अर्ज दाखल केलेला आहे.

०४. प्रस्तुत अर्जाला वादी (प्रतिवादी क्र.१) यांनी नि. ३४ तसेच प्रतिवादी क्र.२ यांनी नि. ३६ वर आपले म्हणणे दिलेले आहे. यातील वादी व प्रतिवादी क्र.२ यांनी आपले म्हणणे सादर करुन प्रतिवादी क्र.१ हिच्या कथनांचा साफ इन्कार केला आहे. त्यांच्यामध्ये असलेल्या नातेसंबंधाबाबत त्यांना वाद नसल्याचे त्यांनी कथन केलेले आहे. वादीच्या म्हणण्यानुसार वादीने प्रतिदावा मिळकत ही दि. १३/०४/१९९९ रोजी रजिष्टर खरेदीखत क्र. २५४/१–७ रू. ८२,५८० चे मोबदल्यात नामे श्री. गजानन चिनकुराव कागणे, रा. कुरळा यांचेकडुन विकत घेतली असुन सदर प्रतिदावा मिळकत विकत घेण्याच्या अगोदरच वादीच्या दोन्ही बहिणीचे म्हणजेच प्रतिवादी क्र.१ व २ यांची लग्न झाली होती व त्यांचा सावत्र भाऊ घरुन निघुन गेला होता व वडील सुध्दा मयत झाले होते. त्यामुळे प्रतिदावा मिळकत ही त्यांची स्वःसंपादीत मिळकत असल्याचे त्यांनी कथन केलेले आहे.

०५. तसेच वादीच्या पुढील कथनानुसार, प्रतिदावा गट क्र.२४ चे क्षेत्र १ हेक्टर ८२ आर क्षेत्राचे वादीच्या सावत्र आईच्या हक्कात झालेले खरेदीखत हे वादीच्या इच्छेविरुध्द झाले असल्याने ते बेकादेशीर आहे. तसेच वादीच्या आईने केलेले दिनांक २२/०५/२०१३ रोजीचे वाटणीपत्र देखील वादीच्या इच्छेविरुध्द व बेकायदेशीर असुन ते वादीवर बंधनकारक नसल्याचे कथन केलेले आहे. याउलट, प्रतिवादी क्र.१ हिने वादी यांच्याकडुन हात उसणे पैसे म्हणुन रक्कम रु.१,५०,०००/– घेतले होते व त्याची परतफेड करावी म्हणुन वादीने प्रतिवादी क्र.१ यांना पैसे देण्याबाबत सुचविले असता, त्यांनी वेळोवेळी पैसे देण्याचे टाळलेले आहे. याउलट, प्रतिवादी क्र.१ हिचे पती सतिश बनसोडे याने वादीला असे म्हटले की, पैसे पाहिजे असतील तर, त्यांना

अर्धी जमिन वाटुन द्या. प्रतिवादी क्र.१ हिला प्रतिदावा करण्याचे कोणतेही संयुक्तीक कारण घडलेले नसुन वादीला व प्रतिवादी क्र.२ यांना त्रास देण्याच्या उद्देशाने सदर प्रतिदावा व प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज हा खर्चासह खारीज करण्यात यावा अशी विनंती वादी व प्रतिवादी क्र.२ यांनी केलेली आहे.

०६. अर्ज, म्हणणे, प्रकरणातील कागदपत्रे यावरुन पुढील मुद्दे माझ्या विचारार्थ निघतात. त्यांना मी माझी कारणांसहित उत्तरे यापुढे नमूद करीत आहे.

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | प्रतिवादी क्र.१ हे प्रथमदर्शनी केस सिध्द करतात काय ? | : | **होकारार्थी** |
| २. | सोईस्करतेची तुला प्रतिवादी क्र.१ च्या बाजुने आहे असे ते सिध्द करतात का ? | : | **होकारार्थी** |
| ३. | मागणी केलेप्रमाणे तुर्तातुर्त मनाई न दिलेस प्रतिवादी क्र.१ चे अपरिमित नुकसान होणार आहे. असे प्रतिवादी क्र.१ सिध्द करतात काय ? | : | **होकारार्थी** |
| ४. | काय आदेश ? | : | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

०७. प्रतिवादी क्र.१ व वादी यांनी अर्जाचे पुष्ठ्यार्थ दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले व त्याचा योग्य ठिकाणी उल्लेख केलेला आहे.

**मान्य तथ्ये :**

०८ वादी व प्रतिवादी हे भाऊ–बहीण असुन प्रतिवादी क्र.१ ही वादीची सावत्र बहिण असुन प्रतिवादी क्र.२ ही वादीची सख्खी बहिण आहे.

**मुद्दा क्रमांक १ ते ४ च्या अनुषंगाने :**

०९. सदरचे चारही मुद्दे एकमेकांशी संल्लग्न असल्याने पुनरावृत्ती टाळणेसाठी मी ते एकत्रीत विचारात घेत आहे.

१०. प्रस्तुत प्रकरणी प्रतिवादीतर्फे विधीज्ञांनी प्रतिदावा मिळकत ही तिच्या आईने दिनांक २२.०५.२०१३ रोजीच्या वाटणीपत्राने (निशाण ४७ अ.क्र.१) प्रतिवादी क्र.१ व तिचा भाऊ रमेश इंगळे यांना वाटुन दिली आहे व रमेश इंगळे हा २० वर्षापासुन बेपत्ता असल्याची जाणीव वादीस देखील असल्याने प्रतिदावा मिळकत ही प्रतिवादी क्र.१ च्या कब्जेवहिवाटीत आहे. सदर मिळकतीशी वादी व प्रतिवादी क्र.२ यांचा कोणताही संबंध नाही. असे असतांना देखील वादी हे प्रतिदावा मिळकतीच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करीत आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची मागणी प्रतिवादी क्र.१ यांनी केलेली आहे.

११. याउलट वादी (प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.१) यांनी प्रतिदावा मिळकत गट क्र.२४ ही संपुर्ण मिळकत ही रजिष्टर खरेदीखताने विकत घेतली असुन ती वादी व वादीच्या वडीलांनी केलेल्या आर्थिक मदतीतुन विकत घेतलेली आहे. तसेच दावा मिळकत ही स्वःकष्टार्जीत मिळकत आहे. असे असतांना, वादीने बळजबरीने नोकरी लागण्यासाठी सावत्र आईच्या अट्टहासामुळे दावा मिळकत ही सावत्र आईच्या नावावर करुन दिलेली आहे. परंतु सदर खरेदीखत हे वादीच्या ईच्छेविरुध्द झालेले असल्याने ते बेकायदेशीर आहेत व त्यानुसार कोणतीही हक्क निर्माण झालेले नाहीत. तसेच दावा मिळकत देखील वादीच्या कब्जेवहिवाटीत आहे. त्यानंतर वादीच्या सावत्र आईने केलेले वाटणीपत्र देखील केवळ सावत्र आईच्या आग्रहाखातर व तिची शेवटची ईच्छा असल्याने व तो वाटणीपत्राच्या दस्तावर वादीने ईच्छेविरुध्द सह्या केल्या आहेत व ते देखील वादीच्या ईच्छेविरुध्द झाले असल्याने बेकायदेशीर आहे असा युक्तीवाद वादी यांनी केलेला आहे. तसेच सदर वाटणीपत्राव्दारे प्रतिवादी क्र.१ कथन करतात त्याप्रमाणे कोणतीही प्रतिदावा मिळकत उत्तर–दक्षिण धुरा टाकुन प्रतिवादी क्र.१ चे कब्जात नसल्याचा देखील युक्तीवाद करुन अर्ज नामंजुर करण्याची मागणी केलेली आहे.

१२. याठिकाणी वादीची मुळ केस ही सावत्र आईच्या हक्कात झालेले मुळ खरेदीखत व सावत्र आईने केलेले वाटणीपत्र हे दोन्ही दस्त वादीने आईचा हट्ट पुरविण्याकरीता केल्याचे कथन केलेले आहे. परंतु सकृतदर्शनी सदर दोन्ही दस्तांवर वादीच्या सह्या आहेत. सदरचे दोन्हीही दस्त इच्छेविरुध्द झाले आहे किंवा कसे ही बाब पुरव्याअंती ठरविणेच योग्य ठरेल. याउलट सकृतदर्शनी खरेदीखताचा महसुल सदरी अंमल झाल्याचे तसेच मिळकत ही खरेदीखतानुसार सावत्र आईच्या कब्जात गेल्याचे दिसते. वादीने मिळकत ही त्याचे कब्जात असल्याचे कथन केले असले तरी

त्यासंबंधीचा कोणताही दस्त अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे सद्यस्थितीत सकृतदर्शनी सदरचे खरेदीखत व वाटणीपत्र हे बेकायदेशीर असल्याचे म्हणता येणार नाही.

१३. पुढे जाऊन, तथाकथीत वाटणीपत्र (निशाण ४७ अ.क्र.१) हे नोंदणीकृत नसले तरी कायद्यातील स्थापीत तत्वानुसार अंतरिम मनाईच्या अर्जाच्या वेळी त्याचा विचार केला जाऊ शकतो व त्यातील कथने देखील विचारात घेतली जाऊ शकतात. सदर वाटणीपत्राचे सकृतदर्शनी अवलोकन केले असता, त्यानुसार दावा मिळकतीची वाटणी वादीच्या सावत्र आईने केल्याचे दिसते व त्यानुसार वंदना व रमेश यांना प्रतिदावा मिळकत उत्तर–दक्षिण धुरा टाकुन चतुःर्सिमेप्रमाणे कब्जात दिलेली आहे. तसेच त्याचा महसुली सदरी देखील अंमल झाल्याचे नि.३ अ.क.८ वरील सातबारा उतारावरुन दिसुन येते. सदरच्या वाटणीपत्राचे दस्तावर देखील सकृतदर्शनी वादीची सही आहे. तसेच रमेश इंगळे हा बेपत्ता असल्याची बाब वादीने देखील सकृतदर्शनी मान्य केलेली आहे व वादीने मुळ दाव्यात रमेश यास मयत घोषीत करण्यात यावे अशी देखील जाहीरनाम्याची मागणी केली आहे. वादीने प्रतिदावा मिळकत त्याचे कब्जात असल्या संदर्भात नि.४१ व ५० वर कृषीकेंद्राच्या व बी–बियाणे खरेदीच्या पावत्या दाखल केलेल्या आहेत. परंतु त्यावरुन प्रतिदावा मिळकत ही वादीच्या कब्जेत आहे असे सकृतदर्शनी म्हणता येत नाही. फारफार तर सकृतदर्शनी वाटणीपत्राअन्वये उर्वरित दावा मिळकत गट क्र.२४ मधील ९१ आर क्षेत्र वादीचे कब्जात असल्याचे दिसते. तसचे वादीने नि.४५ अ.क.१ वर कब्जे वहीवाटी संदर्भात स्वयंघोषणापत्र दाखल केले आहे. परंतु अभिलेखावरील खरेदीखत तसेच वाटणीपत्रावरुन तसेच महसुल सदरी झालेल्या नोंदीवरुन (नि.क्र.३ अ.क्र.८) सकृतदर्शनी संपुर्ण प्रतिदावा मिळकत वादीचे कब्जेमध्ये असल्याचे सद्यस्थितीत दिसुन येत नाही. वादीने नि.४८ वर कब्जेवहिवाट दर्शविणेकामी लगतचे खातेधाराचे शपथपत्र दाखल केले आहे. परंतु उपरोक्त चर्चेनुसार सकृतदर्शनी दावा मिळकतीचे प्रथम वादीनेच खरेदीखत केल्याचे व नंतर वाटणीपत्र देखील मान्य केल्याचे व त्याचा महसुल सदरी अंमल देखील झाल्याने, सदर शपथपत्र वादीस सहाय्य ठरत नाही.

१४. याउलट प्रतिवादीने प्रतिदावा मिळकतीचे सातबारा उतारा (नि.क्र.३ अ.क्र.८) व पीकविमा योजना पावती नि.५५ अ.क.१ वरुन, प्रतिदावा मिळकत तिचे कब्जामध्ये असल्याचे कथन केले आहे. त्या दस्तावरून प्रतिदावा मिळकती संदर्भात विमा काढण्यात आल्याचे दिसते व ती प्रतिवादी क्र.१ च्या कब्जेवहिवाटीत असल्याचे दिसते.

१५. एकंदरीत, ***सकृतदर्शनी दावा मिळकतीचे प्रतिवादी क्र.१ च्या म्हणजेच सावत्र आईच्या हक्कात खरेदीखत वादीनेच करुन दिल्याचे, त्यानंतर प्रतिवादी क्र.१ च्या आईने वाटणीपत्राअन्वये प्रतिदावा मिळकत प्रतिवादी क्र.१ व रमेश याच्या कब्ज्यात दिल्याचे, रमेश हा बेपत्ता असल्याचे वादीने देखील मान्य केल्याचे, इतर कागदपत्रे म्हणजेच प्रतिदावा मिळकतीचा सातबारा उतारा व पीकविमा योजना पावती देखील मिळकत प्रतिवादी क्र.१ च्या कब्जात असल्याचे सकृतदर्शनी दर्शविते. त्यामुळे सकृतदर्शनी प्रतिवादी क्र.१ च्या कथनात तथ्य दिसते***.

१६. उपरोक्त चर्चेनुसार, प्रतिवादी क्र.१ ने सकृतदर्शनी केस सिध्द केलेली आहे. तसेच वादीने प्रतिदावा मिळकत त्याचे कब्जेवहिवाटीत असल्याची केस मांडुन एकप्रकारे हरकत अडथळाच केलेला आहे. त्यामुळे सोयीस्करतेचा तुला व अपरिमीत नुकसानीचे तत्व हे देखील त्यांच्या बाजुने आहे. त्यामुळे मागणी प्रमाणे तुर्तातुर्त मनाई आदेश मिळण्यास सकृतदर्शनी प्रतिवादी क्र.१ पात्र असल्याचे दिसते. सबब मी मुद्या क्र. १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

१७. सबब, उपरोक्त चर्चेनुसार तसेच कायद्यातील तरतुदीनुसार आणि वर नमुद कारणांकरिता मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे. व मुद्दा क्र. ४ चे उत्तरार्थ पुढील आदेश पारित करत आहे.

## <u>आदेश</u>

०१. प्रतिवादी क्र.१ चा अर्ज (निशाण क्र. ३३) **मंजूर** करणेत येत आहे.

०२. दाव्याच्या अंतिम निकालापावेतो प्रतिदावा मिळकतीचे प्रतिवादी क्र.१ चे कब्जे वहिवाटीचे उपभोगास हरकत, अडथळा येईल असे कोणतेही कृत्य वादी (प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.१) व प्रतिवादी क्र.२ यांनी अथवा त्यांचे वतीने त्यांचे नातेवाईक, गडीमाणसे, नोक–चाकर, एजंट, मुखत्यार यांचेमार्फत करु नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश देणेत येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by AMIT SUNIL KOSHTI
Date: 2024.12.12 11:18:38 +0530

स्थळ : मालेगांव.
दिनांक : ०६.१२.२०२४.

**( अ. सु. कोष्टी )**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मालेगांव.

**CERTIFICATE**

**I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.**

| | |
|---|---|
| Name of Stenographer | Shri. C. R. Lande (Grade III ) |
| Name of Court | C.J.J.D. & J.M.F.C., Malegaon, Distt. Washim. |
| Date of Dictation | 06/12/2024 |
| Judgment/Order signed by the PO on | 06/12/2024 |
| Judgment /Order uploaded on | 12/12/2024 |